भोईवाडा पोलीस ठाणे - मनाई आदेश भंग

आरोपी मोहम्मद हानिफ उर्फ जुगनु शौकतअली अंन्सारी, वय 39 वर्षे, रा.धोबी तलाव, भिवंडी यास पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-2, भिवंडी यांनी ठाणे जिल्हयातील ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगरे, पालघर, रायगड आणि नवी मुंबई जिल्हा या महसुली हद्दीतुन एक वर्ष कालावधीकरिता हद्दपार करण्याचे आदेश, दि.11.03.2023 अन्वये दिले होते. परंतू सदर आरोपी याने त्यास सदर महसुली जिल्हयामध्ये मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-2 भिवंडी यांचे परवानगीशिवाय प्रवेश करण्यास मनाई असताना सदर मनाई आदेशाचा भंग करून, दि.07.03.2024 रोजी 06.30 वा. चे सुमारास, धोबी तलाव, भिवंडी येथे भोईवाडा पोलीस ठाणेचे पथकास मिळुन आला. सदर प्रकाराबाबत सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादी वरून आरोपीविरूध्द गुन्हा रजि. नं. ।। 279/24 महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 142 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपी मोहम्मद हानिफ उर्फ जुगनु शौकतअली अंन्सारी, वय 39 वर्षे यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोना/529 सांवत हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,

पोलीस आयुक्तालय,

ठाणे शहर